# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक २५/११/2020 (बुधवार)

---

## जुगार अड्ड्यावर धाड, ४२, ४८० /– रु. च्या मुद्देमालासह पाच जुगारी इसमांना ताब्यात घेण्यात आले – स्थानिक गुन्हे शाखेची कार्यवाही

१) पोलीस ठाणे खापा– अंतर्गत मौजा वाकी शिवारात दिनांक २४/११/२०२० रोजी स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीणचे पथक गस्तीवर असता मिळालेल्या गोपनिय माहितीच्या आधारे एका जुगार अड्ड्यावर धाड टाकण्यात आली. सदर ठिकाणी १) भुषन रमेश कडसाईत, वय २५ वर्षे, रा. भेंडाळा, २) अविनाश आनंद तिवाडे, वय२३ वर्षे, रा.वाकोडी, ३) ज्ञानेश्वर दौलत सोरमारे, वय ४५ वर्षे, रा. वाकी, ४) अनिल काशिनाथ मिलमिले, वय ४५ वर्षे, रा. वाकी, ५) निलेश भाऊराव बागडे, वय २५ वर्षे, रा. वाकी यांना ताब्यात घेवुन त्यांचेकडुन नगदी ११,८४०/– रु. आणि ०४ मोबाईल संच असा एकुण ४२,८४०/– रु. चा मुद्देमाल जप्त करुन त्यांचे विरुद्ध पोलीस ठाणे खापा येथे महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्याचे कलम १२ अन्वये गुन्हा नोंदवुन पोलीस ठाणे खापा यांचे स्वाधीन करण्यात आले. सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक श्री राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक श्री राहुल माकणीकर यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री अनिल जिट्टावार, पोलीस उपनिरीक्षक नरेंद्र गौरखेडे, सहा. पोलीस उपनिरीक्षक बाबा केचे, पोलीस हवालदार चंद्रशेखर घडेकर, महेश जाधव, गजेंद्र चौधरी, पोलीस शिपाई अमृत किनगे, रोहन डाखोळे यांनी यशस्वीरित्या पार पाडली.

टिप :– सदर कार्यवाहीचे छायाचित्र सोबत संलग्न करण्यात आले आहे.

## चोरी

१) पोलीस ठाणे मौदा:– अंतर्गत फिर्यादी नामे सौ. विशाखा लुलेश्वर धरमसारे, वय ४२ वर्षे, रा. गणेश चौक, भंडारा या दिनांक २३/११/२०२० रोजी एच. बी. टाऊन, नागपूर येथुन भंडारा येथे जाण्याकरिता महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळच्या बसमध्ये प्रवासाकरिता बसल्या असता त्यांचे बाजुला दोन अज्ञात महिला बसल्या होत्या. त्या १३.०० वा. दरम्यान परमात्मा एक सेवक मंडळ, मौदा येथे उतरल्या. त्यानंतर फिर्यादी यांनी प्रवासादरम्यान त्यांचे बॅगची पाहणी केली असता बॅगमधील साडे तीन ग्रमचे सोन्याचे मंगळसूत्र कि. ६०,०००/– व नगदी २,०००/– रु तसेच मोबाईल फोन मिहून आले नाही. सदर प्रकरणी पोलीस ठाणे मौदा येथे फिर्यादी यांचे तक्रारीवरुन

अज्ञात अरोपीविरुद्ध कलम ३७९ भादंवि अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. गुन्ह्याचा तपास पोलीस हवालदार श्री चांगदेव कुथे हे करीत असुन अज्ञात आरोपीचा शोध सुरु आहे.

## विनयभंग

१) पोलीस ठाणे कळमेश्वर :– अंतर्गत दिनांक २३/११/२०२० चे २०.०० वा दरम्यान मातोश्री हॉस्पीटल, कळमेश्वर येथे फिर्यादी महिला ही हजर असतांना पेशंन्टसोबत आलेला इसम नामे अमित ठाकरे, रा. कळमेश्वर याने फिर्यादीचे पायात पाय टाकला आणि खांद्याला हात पकडुन लज्जास्पद वर्तणुक करुन पाठलाग केला. सदर प्रकरणी फिर्यादी यांचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे कळमेश्वर येथे कलम ३५४, ३५४ अ, ३५४ ड भादंवी अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला असुन पुढील तपास सहा. पोलीस उपनिरीक्षक श्री नरेश नारनवरे हे करीत आहेत.

## निष्काळजीपणे भरधाव वेगाने वाहन चालवुन मरणास कारणीभुत

१) पोलीस ठाणे उमरेड :– अंतर्गत वेकोली पार्किंग यार्ड, एम. के. डी. १, मकरधोकडा येथे दिनांक २४/११/२०२० चे ०७.०० वा. दरम्यान यातील मृतक नामे गुरूमीतसिंग बलकारसिंग, वय ३७ वर्ष हे वेकोली पार्कींग यार्ड एम.के.डी १, मकरधोकडा येथे आपले ट्रक क्र एनएल–०१ एबी–२५६४ मध्ये कोळसा भरण्याकरीता गाडी पार्क करून ट्रक चे समोरचा भाग पुसत असता त्यांचे ट्रक चे समोर असलेला ट्रेलर क्र एमएच–३४ एबी–५०६३ चा चालक याने आपले ताब्यातील वाहन निष्काळजीपणे व हलगर्जी पणाने जोरात रिवर्स घेउन मागे उभा असलेल्या ट्रकला धडक मारली. यात गुरूमीतसिंग बलकारसिंग, वय ३७ वर्ष हे मरण पावले. सदर प्रकरणी महमद मुनाफ महमद आरीफ, वय ४७ वर्ष, रा. संजय रायपुर, ता. जि. रायपुर (छत्तीसगढ) ह. मु. वायगाव (घोटुर्ली) यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. उमरेड येथे कलम २७९, ३०४ (अ) भा.दं.वि. सहकलम १३४ (अ)(ब) मोवाका अन्वये ट्रेलर क्र एमएच–३४ एबी–५०६३ चा चालक बन्ना सिंग सिकंदर सिंग रा. सुरजापुर ता. मसुदा, खरवा, अजमेर (राजस्थान) याचे विरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस हवालदार श्री. प्रफुल माहुरे हे करीत आहेत.